प्रधान लेखाशीर्ष २०५९ - हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा या योजने अंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात अनुदान वितरण.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: बियुडी १४१७/प्र.क्र.१७२/स्वासैक-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०१८

**वाचा** :- १) शासन निर्णय साप्रवि क्र. बीयुडी१३१५/प्र.क्र.२९४/स्वासैक-१ दि.५/०१/२०१७ व दि.१४/०३/२०१७.
२) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल,२०१७.
३) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/ अर्थ-३, दि. ३० जून,२०१७.
४) शासन निर्णय साप्रवि क्र. बीयुडी१४१६/प्र.क्र.२६८/स्वासैक-१ दि. २७/०७/२०१७.
५) श्वेत पुस्तिका(White Book)२०१७-१८ भाग दोन-खर्चाचे तपशिलवार अर्थसंकल्पीय अंदाज

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्य लढा, हैद्राबाद मुक्ती संग्राम तसेच गोवा मुक्ती आंदोलन यामध्ये भाग घेऊन ज्यांनी देशासाठी प्राणार्पण केले, अशा व्यक्तींच्या स्मरणार्थ शासनाने राज्यात २०६ हुतात्मा स्मारके उभारलेली आहेत. सदर स्मारके बांधून आता ३४-३५ वर्षाचा कालावधी उलटून गेला असल्याने त्यांची दुरूस्ती/नूतनीकरण करणे आवश्यक असल्याने मा.मंत्री, वित्त,नियोजन व वने यांनी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात हुतात्मा स्मारकांची दुरूस्ती व नूतनीकरण करण्याकरिता रू. २५ कोटी नियतव्यय उपलब्ध करून देण्याची घोषणा केली होती. सदर रु. २५ कोटी इतका निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात विधानमंडळाच्या जुलै, २०१६ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे प्राप्त झाला. त्यानुसार हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्ती/ नुतनीकरणासाठी निधी संदर्भाधीन क्र. ०१ येथील शासननिर्णयान्वये सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या वितरीत करण्यात आला. अद्यापही सदर हुतात्मा स्मारकांचे कामे शिल्लक असल्याने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु. २५,००,००,०००/- (रु. पंचवीस कोटी फक्त) इतका निधी प्राप्त झाला असून त्यानुसार हुतात्मा स्मारकाच्या शिल्लक राहिलेल्या दुरुस्ती व नुतनीकरणासाठीचे अनुदान संबंधित जिल्हाधिका-यांच्या स्वाधीन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय : -**

प्रस्तावनेत नमुद बाब विचारात घेवून राज्यातील हुतात्मा स्मारकाच्या दुरूस्ती/ नुतनीकरणासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध रू.२५,००,००,०००/- (रु. पंचविस कोटी फक्त) निधी राज्यातील २०६ हुतात्मा स्मारकांसाठी मंजुर करण्यात आला आहे. संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रानुसार ७०% च्या मर्यादेत रु. १७,५०,००,०००/-(रु. सतरा कोटी पन्नास लाख फक्त) खर्चास उपलब्ध झाले आहेत.

२. सन २०१६-१७ मध्ये १० कामांसाठी संदर्भाधीन क्र. ०१ येथील शासननिर्णयान्वये वाटप करण्यात आलेला निधी हा राज्यातील नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्यामुळे या ठिकाणी लागलेल्या आचारसंहितेच्या कारणास्तव जिल्हाधिकारी सांगली, बीड, लातूर, वर्धा व गडचिरोली यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेला निधी शासनाला समर्पित केलेला आहे त्यामूळे त्यांना प्रथमत: संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ०१ येथिल १३कामांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात तरतुद केलेल्या निधीमधून विवरण पत्र -अ नुसार रक्कम उपलब्ध करून देण्यात येत आहे व या जिल्हाधिका-यांना रक्कम अदा करून शिल्लक राहिलेली सर्व रक्कम सोबत जोडलेल्या विवरण पत्र -ब नुसार संबंधित जिल्हाधिका-यांना त्यांच्या जिल्ह्यांच्या समोर दर्शविलेल्या हुतात्मा स्मारकांच्या संख्येनुसार सर्व स्मारकांसाठी निधी वितरीत करण्यात येत आहे.

३. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना वितरीत केलेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच वितरीत करण्यात आलेली रक्कम ही शासन मान्यता प्राप्त खालील बाबींसाठीच खर्च करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

(१)स्मारकाच्या फरसबंदीमध्ये (फ्लोरिंग) एकसमानता ठेवणे :- सर्व हुतात्मा स्मारकांच्या फरसबंदीकरिता पॉलिश कोटा (Mirror Polish ) वापरण्यात यावा व आतमध्ये ग्रेनाईटची पट्टी बसविण्यात यावी.

(२) विद्युतीकरण :- सर्व हुतात्मा स्मारकांच्या हॉलमध्ये प्रोजेक्टरसाठी व वातानुकुलित यंत्रासाठी आवश्यक ती विद्युत व्यवस्था करण्यात यावी.

(३)मिटर रुम :- प्रत्येक हुतात्मा स्मारकात स्वतंत्र मिटर रुम साठी खोली देण्यात आली आहे. हे मीटर बाहेर काढून या ठिकाणी अद्यावत ग्रंथालय करणे.

(४)स्वयंपाकघर :- सर्व हुतात्मा स्मारकातील स्वयंपाकघर अद्यावत करणे.

(५)बेसिन व बाथरुम :- सर्व हुतात्मा स्मारकांसाठी बेसिन उपलब्ध करुन देणे. व असणारे बाथरुम अद्यावत करुन भिंत बसविणे.

(६)खिडक्या :- सर्व हुतात्मा स्मारकांसाठी स्लायडिंग विंडो लावण्यात याव्यात.

(७)फॉल्स सिलिंग:- सर्व हुतात्मा स्मारकांसाठी फॉल्स सिलिंग करण्यात यावे.

(८) हुतात्मा स्मारकातील हॉल:- सर्व हुतात्मा स्मारकातील हॉल खाली वर असल्याने ते एकत्र करण्यात यावे.

(९)पत्रे: सर्व हुतात्मा स्मारकांसाठी एकसारखे पावडर कोटेड पत्रे बसविण्यात यावे.

(१०)सेप्टीक टॅक :- ज्या हुतात्मा स्मारकांमध्ये सेप्टीक टॅक नाहीत अशा हुतात्मा स्मारकात सेप्टीक टॅक बसविण्यात यावेत.

(११)सोलर पंप:- सर्व हुतात्मा स्मारकांसाठी सोलर पंप बसविण्यात यावेत.

(१२)नादुरुस्त टाक्या बदलणे:- ज्या हुतात्मा स्मारकातील टाक्या नादुरुस्त झालेल्या आहेत त्याठिकाणी नवीन टाक्या बसविण्यात याव्यात.

(१३)पन्हाळे बसविणे:- पत्र्यावरून पडणारे पावसाचे पाणी एकत्रितपणे खाली पडण्यासाठी पन्हाळे बसविण्यात यावे.

४. सद्यस्थितीत रु. १७,५०,००,०००/-(रु. सतरा कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी उपलब्ध झाला असून त्यापैकी जिल्हाधिकारी सांगली, बीड, लातूर, वर्धा व गडचिरोली यांना संदर्भाधीन क्र. ०१ येथील शासन निर्णयांन्वये देण्यात आलेल्या कामासाठी रु. २,७५,६०,८६८/- (रु. दोन कोटी पंच्याहत्तर लाख साठ हजार आठशे अडुसष्ठ फक्त) इतका निधी वितरित केल्यानंतर शिल्लक राहिलेला रु.१४,७४,३९,१३२/- (रु. चौदा कोटी चौ-याहत्तर लाख एकोणचाळीस हजार एकशे बतीस फक्त )हा निधी सर्व स्मारकांना म्हणजे प्रती स्मारक रु. ७,१५,७२२/-(रु. सात लाख पंधरा हजार सातशे बावीस फक्त) याप्रमाणे वितरित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाने पुढील निधी मुक्त केल्यानंतर त्यानुसार, त्यापुढील निधी वितरणाबाबत निर्णय घेण्यात येईल. जिल्ह्यातील एखाद्या स्मारकास रु. ७,१५,७२२/-पेक्षा कमी खर्च लागणार असल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांनी तो निधी त्याच जिल्ह्यातील आवश्यकता असलेल्या इतर स्मारकांच्या दुरूस्तीकरीता आवश्यकतेप्रमाणे वळवून त्या स्मारकांसाठी खर्च करावा. जिल्ह्यातील इतर स्मारकांकरीता निधी वापरूनसुध्दा काही निधी शिल्लक राहत असल्यास तो चालू आर्थिक वर्ष संपण्यापुर्वी शासनास समर्पित करण्यात यावा.

६. वरील परिच्छेद-३ मधील १३ मुलभुत कामांकरीता प्रशासकीय मान्यता देणे, निविदा प्रक्रीया पार पाडणे व अन्य आवश्यक प्रशासकीय बाबी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर तात्काळ पुर्ण कराव्यात. तसेच, दुरूस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रचलीत मानके व दरपत्रके यानुसार होत असल्याची खात्रीसुध्दा जिल्हाधिकारी यांचेद्वारे करण्यात यावी. त्याचप्रमाणे संदर्भाधीन क्र. ०१ येथील शासन निर्णयानुसार जी १० कामे यापुर्वी देण्यात आलेली आहेत. ती प्रथमत: पुर्ण करण्यात यावीत. व त्यानंतरच परिच्छेद ३मधील कामे घेण्यात यावीत.

७. सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी स्मारकांसाठी निधी मुक्त करण्यापूर्वी स्मारकाच्या सद्यःस्थितीची पाहणी करावी. एखादे स्मारक सुस्थितीत असल्यास त्यासाठी निधी मुक्त करू नये. असा निधी संबंधित जिल्हाधिकारी यांनी आवश्यकता असल्यास जिल्ह्यातीलच इतर स्मारकांसाठी वळवावा किंवा शासनास चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यापूर्वी समर्पित करावा.

८. जिल्हाधिकाऱ्यांना वितरीत केलेल्या निधीतून खर्च केलेल्या अनुदानाच्या रकमांचा ताळमेळ महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर यांचेकडे विहित कालावधीत करुन खर्चमेळाचा मासिक अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा. याप्रकरणी शासन परिपत्रक क्र. खर्चमेळ २०११/प्र.क्र.१३९/२०११/स्वासैक-१, दिनांक १६/८/२०११ नुसार कार्यवाही करावी.

९. याप्रित्यर्थचा चालू आर्थिक वर्षातील खर्च (अ) क्रमांक ए-४ २०५९- सार्वजनिक बांधकामे, (८०) सर्वसाधारण,०५३- परिरक्षण व दुरुस्ती (००) (०१) हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा यासाठी सहायक अनुदान (२०५९ ००१५) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तिय वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

१०. संबंधीत जिल्हाधिका-यांनी वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तीन महिन्यात सादर करावे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१७३८३५०९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arun Vasnt Shinde

Digitally signed by Arun Vasnt Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=213d983c0c3b73519fa14c37396dd0b3cf8f28e16bc2fb6620a5c4fdac6e7284, serialNumber=672d36cc7468aa812e66dbb4704ffeb120dd58831284824f4fbec2a6f6602199, cn=Arun Vasnt Shinde
Date: 2018.02.14 17:42:05 +05'30'

**(अरुण व. शिंदे)**
**कार्यासन अधिकारी,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
५) प्रधान सचिव व वि. चौ. अ. -१ यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई,
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
९) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १, मुंबई,
१०) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र २, नागपूर,
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
१४) स.स. (स्वासैकक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२,
१५) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
१६) सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
१७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०) सामान्य प्रशासन विभाग, का.२५, मंत्रालय, मुंबई,
२१) क.अ. वित्त विभाग, (अर्थ संकल्प १३ / व्यय-४) मंत्रालय, मुंबई,
२२) निवड नस्ती (स्वासैक १).

## विवरणपत्र अ
## (शासन निर्णय क्रमांक: बियुडी १४१७/प्र.क्र. १७२/स्वासैक-१)

शासन निर्णय साप्रवि क्र. बीयुडी१३१५/प्र.क्र.२९४/स्वासैक-१ दि.५/०१/२०१७ व दि.१४/०३/२०१७ वितरित केलेली परंतु खालील जिल्हाधिकारी यांनी शासनाला समर्पित केलेली रक्कम त्यांना सदर शासन निर्णयानुसार जी १० कामे करण्याबाबत सुचीत केले होते ती १० कामे पुर्ण करण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये खालीलप्रमाणे रक्कम वितरित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची संख्या | वितरीत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | सांगली | १५ | १६,३२,०७३/- |
| २. | बीड | ७ | ७६,१३,७८५/- |
| ३. | लातूर | ८ | ८६,२१,०००/- |
| ४. | वर्धा | ८ | ८६३७४३०/- |
| ५. | गडचिरोली | १ | १०५६५८०/- |
| | | **एकूण** | **२,७५,६०,८६८/-** |

(रु. दोन कोटी पंच्याहत्तर लाख साठ हजार आठशे अडुसष्ठ फक्त)

## विवरणपत्र ब
## (शासन निर्णय क्रमांक: बियुडी १४१७/प्र.क्र. १७२/स्वासैक-१)

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | जिल्ह्यातील हुतात्मा स्मारकांची संख्या | मंजुर तरतूद (रु.) | अनुदान वितरण (रु.) |
|---|---|---|---|---|
| *१* | *२* | *३* | *४* | *५* |
| १ | पालघर | ८ | २५००००००० | ५७,२५,७७६ |
| २ | रायगड | १६ | | १,१४,५१,५५२ |
| ३ | सिंधुदुर्ग | ४ | | २८,६२,८८८ |
| ४ | नाशिक | ६ | | ४२,९४,३३२ |
| ५ | जळगाव | २ | | १४,३१,४४४ |
| ६ | नंदुरबार | १ | | ७,१५,७२२ |
| ७ | अहमदनगर | ५ | | ३५,७८,७१० |
| ८ | पुणे | ७ | | ५०,१०,०५४ |
| ९ | सातारा | १४ | | १,००,२०,१०८ |
| १० | सांगली | १५ | | १,०७,३५,८३० |
| ११ | सोलापूर | ५ | | ३५,७८,७१० |
| १२ | कोल्हापूर | ८ | | ५७,२५,७७६ |
| १३ | औरंगाबाद | ७ | | ५०,१०,०५४ |
| १४ | जालना | ५ | | ३५,७८,७१० |
| १५ | बीड | ७ | | ५०,१०,०५४ |
| १६ | नांदेड | १६ | | १,१४,५१,५५२ |
| १७ | हिंगोली | १० | | ७१,५७,२२० |
| १८ | परभणी | ५ | | ३५,७८,७१० |
| १९ | लातूर | ८ | | ५७,२५,७७६ |
| २० | उस्मानाबाद | ११ | | ७८,७२,९४२ |
| २१ | अमरावती | १० | | ७१,५७,२२० |
| २२ | बुलढाणा | ३ | | २१,४७,१६६ |
| २३ | यवतमाळ | २ | | १४,३१,४४४ |
| २४ | अकोला | १ | | ७,१५,७२२ |
| २५ | नागपूर | ११ | | ७८,७२,९४२ |
| २६ | वर्धा | ८ | | ५७,२५,७७६ |
| २७ | भंडारा | ३ | | २१,४७,१६६ |
| २८ | गोंदीया | ३ | | २१,४७,१६६ |
| २९ | चंद्रपूर | ४ | | २८,६२,८८८ |
| ३० | गडचिरोली | १ | | ७,१५,७२२ |
| **एकूण** | | २०६ | | **१४,७४,३९,१३२** |

(रु. चौदा कोटी चौ-याहत्तर लाख एकोणचाळीस हजार एकशे बतीस फक्त )